**आर.सी.सी. ६८२/२०१३**
**निशाणी क्र – ४३.**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : शहनवाज रियाज शेख,
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी,
राहणार : बोपोडी पुणे.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे :-</u>**

१. फियादी माझ्या मावशीची मुलगी आहे. आरोपी क्र. १ फिर्यादीचे सासरे आहेत. आरोपी क्र. २ फिर्यादीची सासु आहे. आरोपी क्र. ३ फिर्यादीचा पती आहे. फिर्यादीचे आरोपी क्र. ३ सोबत दि. ०९.०९.२०१२ रोजी येरवडा पुणे येथे लग्न झाले. लग्नाचा खर्च माझ्या मावशीने केला. लग्नामध्ये आरोपी क्र. ३ ला एक तोळा सोने दिले होते. लग्नानंतर फिर्यादी आरोपींचे घरी कोंढवा येथे एकत्र कुटुंबात नांदण्यासाठी गेली. लग्नानंतर सुरुवातीचे दोन महिने आरोपींनी फिर्यादीला चांगली वागणूक दिली. त्यानंतर लग्नामध्ये डायनिंग टेबल, ओव्हण मायक्रावेव्ह इ. वस्तू दिल्या नाहीत म्हणून आरोपी फिर्यादीसोबत भांडण करत होते. आरोपींनी फिर्यादीकडे आरोपी क्र. ३ ची बहिण मोसिना मर्चंट हिला ऑस्ट्रेलिया येथे पाठवायचे असल्याने रु. २,००,०००/- ची मागणी केली. परंतु फियादीने पैसे दिली नाहीत. आरोपी फिर्यादीला जेवायला देत नसत. फेब्रुवारी २०१३ मध्ये मी व घरचे लोक आरोपींना समजावण्यासाठी गेलो. परंतु आरोपींना आम्हाला घरात घेतले नाही. आम्ही पुन्हा घरी आलो. दि. ३१.०३.२०१३ रोजी आम्ही पुन्हा आरोपींच्या घरी गेलो. तेव्हा पण आरोपींनी आम्हाला घरात घेतले नाही. आरोपी फिर्यादीला व आम्हाला घरात घेणार नाही असे काही तरी बोलले व हाकलून दिले. त्यानंतर आम्ही खडीमशीन पोलीस चौकीत गेलो व आरोपींविरुध तक्रार दिली. तेथून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आम्ही आयुक्त कार्यालयात गेलो व तेथे जबाब दिला. त्यानंतर पोलीसांनी फिर्यादीची फिर्याद घेतली. फिर्याद दिल्यानंतर कोंढवा पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली नव्हती तसेच तपाटिपण नोंदविले होते. फिर्यादीला होणाऱ्या त्रासाची मला प्रत्यक्ष माहिति आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आज आरोपी क्र. १ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. ए.ए.अशरफी यांचेमार्फत -</u>**

२. मी व फिर्यादी एकाच घरात राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. ३ चे लव्ह मॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. ३

एकाच ठिकाणी नोकरी करत होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. ३ लग्नापूर्वी एकमेकांना भेटत होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी लग्न ठरवताना हुंड्याची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामध्ये आरोपींनी रितीरिवाजाप्रमाणे फिर्यादीला सोन्याचा सेट व कपडे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर दुसऱ्या दिवशी रिसेप्शेनचा खर्च आरोपींनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ च्या बहिणीचे लग्न आरोपी क्र. ३ व फिर्यादीच्या लग्नाच्या पूर्वीच झाले होते व ती सासरी मुंबई येथे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर सुमारे अडीच महिने फिर्यादीची कोणतीही तक्रार नव्हती व तीने मला तसे सांगितले होते. फिर्यादीने आरोपींनी तिच्याकडे डायनिंग टेबल, मायक्रो वेव्ह ओव्हाण व ऑस्ट्रेलियाला नंदेला पाठवण्यासाठी २ लाखाची मागणी कधी केली ती नेमकी तारीख व दिवस सांगू शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की फेब्रुवारी २०१३ फिर्यादीने मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, फियादीने आरोपींनी तिच्या डायनिंग टेबल, मायक्रो वेव्ह ओव्हाण व ऑस्ट्रेलियाला नंदेला पाठवण्यासाठी २ लाखाची मागणी केली असे मला सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीकडे डायनिंग टेबल, मायक्रो वेव्ह ओव्हाण व ऑस्ट्रेलियाला नंदेला पाठवण्यासाठी २ लाखाची मागणी केलीच नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यदीचे सासरचे घर सोसायटीमध्ये असून दोन बेडरुमचे आहे व त्या सोसायटीचे नाव एचएम रॅायल असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे घर ज्या सोसायटी मध्ये आहे तेथे ती इमारात १२ मजली असून तशा पाच ते सहा इमारती आहेत व तेथे लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापूर्वी फिर्यादी व तीची आई खरेदीसाठी आरोपी क्र. ३ च्या बहिणीकडे मुंबईला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ते ३ नोकरी करतात व सकाळी त्यांच्या कामाच्या ठिकाणी जातात व तिघेही कमावते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची आर्थिक परिस्थिती फिर्यादीच्या आर्थिक परिस्थितीपेक्षा चांगली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी मुफ्ती अब्दुल्ला नावाच्या धर्मगुरुकडे वाद मिटवण्यासाठी गेले होते याची मला माहिती आहे. आम्ही ज्या वेळेस आरोपींच्या घरी गेलो होतो त्याची पूर्वकल्पना मी आरोपींना दिली होती. परंतु दि ३१.०३.२०१३ रोजी आरोपींच्या घरी गेल्याची पूूर्वकल्पना त्यांना दिली नव्हती. आता मला नि.क्र. ३९ कडील कागद दाखविण्यात आला. सदर तक्रार फिर्यादीने दि. १३.०३.२०१३ रोजी केल्याची मला माहिती आहे. फिर्यादीने पोलीस आयुक्त कार्यालयात जी तक्रार दिली त्यातील मजकूर मला माहिती नाही. आम्ही पेलीस आयुक्त कार्यालयात मार्च २०१३ मध्ये गेलो होते व तेथे लेखी तक्रार अर्ज दिला होता व ती तक्रार आरोपींच्या विरुध्दच होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही

गुन्हा केला नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष,

सहि/-
(अ.अ.कुलकर्णी)
३रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : २६/०८/२०२५.